

## आयआयएममध्ये संत्रा उत्पादकांसाठी कार्यशाळा

**नागपूर** : इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) आणि महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने संत्रा उत्पादकांसाठी सात दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात नागपूर आणि अमरावती जिल्ह्यातील तीनशेहून अधिक संत्रा उत्पादक सहभागी झाले होते. महाराष्ट्रातील फळ उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने एशियन डेव्हलमेंट बँकेच्या (एडीबी) सहायाने मॅग्नेट उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत राज्यातील ३० हजार फळ उत्पादकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. 'ग्रांट थोर्नटन भारत' या कंपनीची या उपक्रमासाठी नेमणूक करण्यात आली आहे. यावेळी एडीबीचे कार्यकारी संचालक चान्टले वॉंग, सर्जिओ लुगारेसी, समीर कुमार खरे, कंट्री डायरेक्टर ताकिओ कोनिशी, अनुप कुमार, आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मैत्री, नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर आदींची उपस्थिती होती.